**रे. दि. मु. क्रमांक १९३/२०२१ मधील नि.क्र. १३ खालील आदेश.**

**सुनिल गाढवे -विरुध्द- शंकर गाढवे व इतर**

**आदेश पारित दिनांक ०५.१२.२०२३**

---

प्रतिवादी क्र. १, २, ३-अ, ३-ब, ३-ड, ४-अ, ४-क व ५ यांनी प्रस्तूतचा अर्ज वादीने दाखल केलेल्या दाव्यास प्रतिवादी यांचेविरुध्द 'विना म्हणणे व कैफियत' असा झालेला आदेश रद्द होवून मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर अर्जासोबत प्रतिवादी क्र. १ नामे शंकर गेणबा गाढवे यांचे सत्यप्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १४ वर दाखल केले आहे.

**०२.** अर्ज वाचला. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत अर्जात प्रतिवादी क्र. १, २, ३-अ, ३-ब, ३-ड, ४-अ, ४-क व ५ यांनी कथन केले आहे की, त्यांना कैफियत व म्हणणे दाखल करणेस आवश्यक कागदपत्र उपलब्ध न झालेने सदर प्रतिवादी त्यांचे म्हणणे व कैफियत मुदतीत दाखल करू शकले नाहीत. त्यामुळे या न्यायालयाने प्रस्तुत प्रतिवादींतर्फे कैफियत व म्हणणे नाही हा आदेश पारित केलेला आहे. सदर प्रतिवादींना कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल करण्यास विलंब झालेला आहे. हा विलंब माफ होणेचा अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे. तरी प्रतिवादी क्र. १, २, ३-अ, ३-ब, ३-ड, ४-अ, ४-क व ५ यांच्या विधिज्ञांनी 'कैफियत व म्हणणे नाही' चा आदेश सदर प्रतिवादींविरुध्द झालेला आदेश रद्द होवून मिळावा आणि सदर प्रतिवादींची कैफियत व म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळावी, ही विनंती केली आहे.

**०३.** सदरकामी, वादीने हे लेखी म्हणणे दिले आहे की, सदर दाव्यात प्रतिवादी यांना दिनांक १४.१२.२०२२ रोजी दावा समन्सची बजावणी झालेली आहे. सदर दाव्यातील वादी हे अत्यंत गरीब असून सदर दाव्यात प्रतिवादी यांनी जाणूनबुजून कैफियत दिलेली नाही. सदर प्रतिवादी यांनी वेळेवर कैफियत न देवून मे. कोर्टाचा व वादी यांचा वेळ वाया घालविलेला आहे. त्यामुळे वादीस खूप मोठा खर्च झालेला आहे. प्रतिवादी यांनी मे. कोर्टाचा अनमोल वेळ घालविलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचा अर्ज फेटाळण्यात यावा व प्रतिवादीस र.रु. २,०००/- ची कॉस्ट करून अर्ज फेटाळण्यात यावा, ही विनंती केली आहे आणि त्याच अनुषंगाने युक्तीवाद देखील केला आहे.

**०४.** प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादींना त्यांची कैफियत आणि म्हणणे अभिलेखावर दाखल करणे आवश्यक आहे. त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला ०३ महिने ०६ दिवसांचा विलंब माफ होवून कैफियत व म्हणणे दाखल होणेकरिता सदर प्रतिवादींनी प्रस्तूत अर्ज दाखल केला आहे.

**०५.** प्रस्तूत दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होणेकरिता प्रतिवादींची कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल असणे आणि दोन्ही बाजूंच्या म्हणण्याचा संपूर्ण विचार होणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. १, २, ३-अ, ३-ब, ३-ड, ४-अ, ४-क व ५ यांचे विहित वेळेत कैफियत व म्हणणे दाखल न करण्याचे त्यांनी दर्शविलेले कारण संयुक्तीक आहे आणि त्यांचा प्रस्तूतचा अर्ज मंजूर होवून त्यांना त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची संधी देणे आणि त्याद्वारे परिणामकारकरित्या दाव्यातील संपरिक्षा चालविणे न्यायोचित आहे. सबब, प्रतिवादी क्र. १, २, ३-अ, ३-ब, ३-ड, ४-अ, ४-क व ५ यांचा प्रस्तूत अर्ज पुढीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. १, २, ३-अ, ३-ब, ३-ड, ४-अ, ४-क व ५ यांचा निशाणी क्र. १३ वरील अर्ज मंजूर करणेत येतो. |
| २. | प्रतिवादी क्र. १, २, ३-अ, ३-ब, ३-ड, ४-अ, ४-क व ५ यांच्या विरोधात 'विना म्हणणे व कैफियत' असा झालेला हुकूम रद्द करणेत येतो आणि त्यांना त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येते. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

स्वाक्षरीत/-
(अ. क. दामटे)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

दिनांकः- ०५.१२.२०२३